AC – 20/05/2025

Item No. – 5.50 (N) Sem-IV 4(b)

# As Per NEP 2020

# University of Mumbai

| | |
|---|---|
| Syllabus for<br>Basket of Marathi - OE<br>Vertical 3 | |
| Faculty of Arts | |
| Board of Studies in Marathi | |
| UG Second Year Programme | |
| Semester | IV |
| Title of Paper | मराठीचा शब्दसंग्रह आणि उपयोजन |
| Credits | 2 |
| From the Academic Year | 2025-26 |

**Syllabus**

**B.A. (Marathi - OE)**

**Semester - IV**

**Title of Paper : मराठीचा शब्दसंग्रह आणि उपयोजन**

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **अभ्यासक्रमाचे वर्णन** (**Description of the Course) :** | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० चे आंतरविद्याशाखीय उद्दिष्ट लक्षात घेऊन, **मुक्त वैकल्पिक (Open Elective)** या स्तंभांतर्गत **चौथ्या** सत्रासाठी मराठी विषयाच्या **'मराठीचा शब्दसंग्रह आणि उपयोजन' (श्रेयांकने २)** या अभ्यासपत्रिकेची आखणी करण्यात आली आहे. **M1-M2** या प्रारूपांतर्गत अध्ययन करणाऱ्या सामाजिक शास्त्र (Social Science) व विज्ञान (Science) विद्याशाखांमधील विद्यार्थ्यांनी सदर अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करणे अपेक्षित आहे. वाणिज्य (Commerce) विद्याशाखेतील विद्यार्थीही या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करू शकतात.<br>'शब्द' हा भाषेच्या संरचनेचा महत्त्वाचा घटक असतो. भाषेची श्रीमंती त्या भाषेतील शब्दसंग्रहावर अवलंबून असते. शब्दसंग्रह जेवढा विपुल आणि वैविध्यपूर्ण तेवढी ती भाषा संपन्न असते. मानवी भाषा ही प्रवाही असल्याने, तिच्यामध्ये बदलत्या भोवतालानुसार शब्दांची भर पडत असते किंवा काही शब्द वापरातून मागे पडत असतात. भाषिक क्षमता विकसित करण्यासाठी अशा शब्दांच्या अर्थच्छटा, त्यांचे लाक्षणिक आणि सूचक अर्थ माहीत करून घ्यावे लागतात.<br>उपरोक्त संदर्भ लक्षात घेऊन **'मराठीचा शब्दसंग्रह आणि उपयोजन' (श्रेयांकने २)** या अभ्यासपत्रिकेच्या अध्ययनातून मराठीतील शब्दसंग्रह, शब्दसमूहाचे वैविध्य, शब्दसिद्धी व शब्दसंधीचा परिचय विद्यार्थ्यांना व्हावा, असे अपेक्षित आहे. भाषेच्या अभ्यासात शब्दांचा अभ्यास महत्त्वाचा असतो, हे या अभ्यासपत्रिकेच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल, तसेच विद्यार्थ्यांची भाषिक क्षमता विकसित होईल. |
| 2 | **Vertical :** | Open Elective |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit :** | 2 Credits (1 Credit = 15 Hours for Theory or 30 Hours of Practical Work in a Semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 30 Hours |
| 6 | **Marks Allotted :** | 50 Marks |

| | |
|---|---|
| 7 | **अभ्यासक्रम उद्दिष्टे (Course Objectives) :**<br>१. मराठीतील शब्दसंग्रहाच्या विपुलतेचा आणि विविधतेचा परिचय करून देणे.<br>२. मराठीतील शब्दसमूहाबद्दल एक शब्द, समानार्थी, विरुद्धार्थी, अपरिचित/ अप्रचलित शब्द, आलंकारिक शब्द, म्हणी व वाक्प्रचार या कोटींचा (Categories) परिचय करून देणे.<br>३. मराठी शब्दसंग्रहातील विविध शब्द, म्हणी व वाक्प्रचार यांचे वाक्यातील उपयोजन समजावून सांगणे.<br>४. मराठी शब्दसंग्रहातील शब्दसिद्धी व शब्दसंधीचा परिचय करून देणे.<br>५. मराठी शब्दसंग्रहातील शब्दसिद्धी व शब्दसंधीचे उपयोजन समजावून सांगणे. |
| 8 | **अभ्यासक्रम निष्पत्ती (Course outcomes) :**<br>१. विद्यार्थ्यांना मराठीतील शब्दसंग्रहाच्या विपुलतेचा आणि विविधतेचा परिचय होईल.<br>२. विद्यार्थ्यांना मराठीतील शब्दसमूहाबद्दल एक शब्द, समानार्थी, विरुद्धार्थी, अपरिचित/ अप्रचलित शब्द, आलंकारिक शब्द, म्हणी व वाक्प्रचार या कोटींचा (Categories) परिचय होईल.<br>३. विद्यार्थ्यांना मराठी शब्दसंग्रहातील विविध शब्द, म्हणी व वाक्प्रचार यांचे वाक्यातील उपयोजन समजेल.<br>४. विद्यार्थ्यांना मराठी शब्दसंग्रहातील शब्दसिद्धी व शब्दसंधीचा परिचय होईल.<br>५. विद्यार्थ्यांना मराठी शब्दसंग्रहातील शब्दसिद्धी व शब्दसंधीचे उपयोजन समजेल. |
| 9 | **अभ्यासक्रम घटक (Modules) :** |
| | **घटक - १ : मराठीतील शब्दसंग्रह आणि शब्दसमूहाचे वैविध्य** |
| | १. शब्दसमूहाबद्दल एक शब्द<br>२. समानार्थी आणि विरुद्धार्थी शब्द<br>३. काही अपरिचित/ अप्रचलित शब्दांचे अर्थ<br>४. आलंकारिक शब्द व उपयोजन<br>५. निवडक म्हणी व वाक्प्रचार आणि त्यांचे उपयोजन<br>(सूचना : शिक्षकांनी आपल्या महाविद्यालयाच्या परिसर, सामाजिक, सांस्कृतिक भोवतालानुसार आवश्यक त्या मराठी म्हणी व वाक्प्रचार यांची निवड करावी.)<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) |
| | **घटक - २ : शब्दसिद्धी व शब्दघटना / शब्दसंधी परिचय** |
| | १. प्रत्ययघटित शब्द : प्रकार व उपयोजन<br>२. उपसर्गघटित शब्द : प्रकार व उपयोजन<br>३. अभ्यस्त शब्द : प्रकार व उपयोजन<br>४. सामासिक शब्द : प्रकार व उपयोजन<br>५. शब्दसंधी : प्रकार व उपयोजन<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) |
| | |

| | |
|---|---|
| 10 | **पाठ्य ग्रंथ (Text Books) : N. A.** |
| 11 | **संदर्भ ग्रंथ (Reference Books) :**<br>१. *सुगम मराठी व्याकरण*, मो. रा. वाळंबे, नितीन प्रकाशन, पुणे, २०१०.<br>२. *मराठी व्याकरण आणि लेखन*, मीरा जोशी व विनायक गंधे, निराली प्रकाशन, पुणे, २०१२.<br>३. *मराठीचे व्याकरण*, लीला गोविलकर, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, १९९३.<br>४. *मराठीचे व्याकरण : स्वरूपविचार*, लीला गोविलकर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१५.<br>५. *तुमचे आमचे मराठी व्याकरण*, श्रीपाद भागवत, विद्याभारती प्रकाशन, पुणे, २००३.<br>६. *मराठी व्याकरण : स्वरूप व चिकित्सा,* खंडेराव कुलकर्णी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१९.<br>७. *मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी*, वा. गो. आपटे, वरदा प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती - २०१६. |
| 12 | **Internal Continuous Assessment : 40%** \| **External, Semester End Examination : 60%**<br>**Individual Passing in Internal and External Examination** |
| 13 | **अंतर्गत सातत्यपूर्ण मूल्यांकन (Internal Continuous Assessment) : २० गुण**<br>**अंतर्गत मूल्यांकनाचे स्वरूप (Format of Internal Assessment) :**<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा / प्रकल्पलेखन / नियतकार्य (Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा यांपैकी कोणत्याही पद्धतींचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल.<br>(प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन) |
| 14 | **बहिर्गत परीक्षा (External Examination) : ३० गुण (वेळ : एक तास)**<br>**बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप (Format of Question Paper ) :**<br>१. प्रत्येकी **१५** गुणांचे एकूण **तीन** प्रश्न विचारावेत. त्यांपैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवावेत.<br>२. पहिले **दोन** प्रश्न दीर्घोत्तरी स्वरूपाचे असावेत. दोन्ही घटकांवर आधारित **१५** गुणांचे अंतर्गत पर्याय असलेले **दोन** प्रश्न विचारावेत.<br>३. **तिसरा** प्रश्न हा घटक क्रमांक एक व दोनवर आधारित **१५** गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. प्रत्येक घटकावर दहा याप्रमाणे एकूण **वीस** वस्तुनिष्ठ प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी कोणतेही **पंधरा** प्रश्न सोडवावेत. |

## समिती सदस्यांची स्वाक्षरी (Signatures of Team Members)

| अनु. | नाव | समिती सदस्य | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | डॉ. सतीश कामत | अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ | |
| २. | डॉ. निधी पटवर्धन | समन्वयक | |
| ४. | डॉ. नीलांबरी कुलकर्णी | सदस्य | |
| ५. | डॉ. रवींद्र बेंबरे | सदस्य | |
| ६. | प्रा. शैलेश भिमसिंग औटी | निमंत्रित सदस्य | |

**Sd/-**
**Sign of BOS Chairman**
**Dr. Satish Kamat**
**Board of Studies in Marathi**

**Sd/-**
**Sign of the Offg. Associate Dean**
**Dr. Suchitra Naik**
**Faculty of Humanities**

**Sd/-**
**Sign of the Offg. Associate Dean**
**Dr. Manisha Karne**
**Faculty of Humanities**

**Sd/-**
**Sign of the Dean**
**Prof. Dr. Anil Singh**
**Faculty of Humanities**